महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (MLWF) भरणाऱ्या कामगार /कामगार कुटुंबियांकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना पुढीलप्रमाणे आहेत.

**शैक्षणिक योजना**

**सर्वसाधारण शिष्यवृत्ती** - इ. १० वी पासून पुढील पदवी, पदव्युत्तर पदवीच्या शिक्षणासाठी (तांत्रिक / वैद्यकीय / अभियांत्रिकी इ.) रु. २,०००/- ते रु. ५,०००/- पर्यंतची वार्षिक शिष्यवृत्ती दिली जाते. मागील वर्षी किमान ६० टक्के गुण आवश्यक . तसेच MPSC पूर्वपरीक्षा उत्तीर्ण कामगार पाल्यांना रु. ५,०००/- व UPSC पूर्वपरीक्षा उत्तीर्ण कामगार पाल्यांना रु. ८,०००/-दिले जातात.

**परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती :** परदेशात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या कामगार पाल्यास रु. ५०,०००/– वार्षिक शिष्यवृत्ती दिली जाते. पदवी परीक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक.

**क्रीडा शिष्यवृत्ती-** कामगार / कामगार कुटुंबियांनी क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविल्यास खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती दिली जाते.

| स्पर्धा स्वरुप | प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|---|
| राज्यस्तरीय | रु.५,०००/- | रु.३,०००/- | रु.२,०००/- |
| राष्ट्रीय | रु.५,०००/- | रु.५,०००/- | रु.३,०००/- |
| आंतराष्ट्रीय | रु.१५,०००/- | रु.१५,०००/- | रु.१५,०००/- |

**पाठयपुस्तक अर्थसहाय्य -** इयत्ता ११ वी पासून शिक्षणासाठी कामगार पाल्यांना क्रमिक पाठ्यपुस्तक खरेदी रकमेच्या ५० टक्के रक्कम अर्थसहाय्य दिली जाते.

**MS-CIT अर्थसहाय्य -** MS-CIT परीक्षेत ६० टक्के पेक्षा अधिक गुणांसह उत्तीर्ण झाल्यास शासनमान्य शुल्काच्या ५० टक्के रक्कम कामगार / कामगार पाल्यांना दिली जाते.

**गुणवंत विद्यार्थी गौरव -** इयत्ता १० वी आणि १२ वी च्या परिक्षेत सर्वाधिक (किमान ९० टक्क्यांपेक्षा अधिक) गुण प्राप्त करणाऱ्या कामगार पाल्यांस रु. ५०००/- देण्याची योजना आहे. प्रत्येक गट कार्यालय स्तरावर इयत्ता दहावीचे ३ व इयत्ता बारावीचे ३ अशा एकुण ६ गुणवंतांचा गौरव केला जातो.

**इंग्रजीसह विदेशी भाषा संभाषण प्रशिक्षण -** कामगार व कामगार पाल्यांना इंग्रजी, फ्रेंच, जॅपनीज आदी रोजगाराभिमुख भाषांचे संभाषण व लेखनाचे ज्ञान व्हावे, व्यक्तिमत्व विकास व्हावा, या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली आहे. प्रशिक्षण कालावधी ३ ते ६ महिने आहे. नाममात्र रु.१००/- प्रतिमाह आकारले जाते.

**वाहन चालक प्रशिक्षण -** चार चाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण कामगार व त्यांच्या कुटुंबियांना दिले जाते. वयोमर्यादा किमान १८ ते कमाल ४० वर्ष आहे. किमान ८ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे कामगारांचे वार्षिक उत्पन्न रु. ५ लाखापेक्षा जास्त नसावे.

**गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार -** सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा संघटन आदि क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कामगारास सदर पुरस्कार देऊन गौरविले जाते. कामगाराची एक किंवा विविध आस्थापनांत मिळून एकुण सेवा किमान ५ वर्ष असावी. रु. १५ हजार, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

**कामगार भूषण पुरस्कार :** गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार मिळाल्याच्या १० वर्षानंतर सदर पुरस्कारासाठी अर्ज करता येतो. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्रिडा, संघटन आदी क्षेत्रात भरीव कामगिरी अपेक्षित आहे. रु. २५ हजार, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

**राव बहाद्दुर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार** -किमान २५ वर्षे कामगारांच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था, संघटना यांना हा पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारासाठी अर्ज करायला लावणे उचित नसल्याने समाजातील मान्यवर, उद्योग संस्था, संघटना यांच्याकडून विहीत नमुन्यात माहिती मागविली जाते. प्राप्त माहितीच्या आधारे, गुणवत्तेच्या आधारे व्यक्ती/ संस्था यांची निवड केली जाते. व्यक्तीचे वय ५० वर्षापेक्षा कमी नसावे संस्थेची नोंदणी किमान २५ वर्षांपुर्वी झालेली असावी. रु. ५१ हजार, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

| कार्यक्रम | उपक्रम |
|---|---|
| औद्यौगिक /व्यावसायिक कामगार नाट्य स्पर्धा | शिशुमंदिर |
| महिला / बाल नाट्य स्पर्धा | पाळणाघर |
| लोकनृत्य स्पर्धा / भजन स्पर्धा | शिवणवर्ग (सरकारमान्य/मंडळाचा) |
| समरगीत/ स्फुर्तीगित स्पर्धा | संगणक प्रशिक्षण वर्ग |
| कामगार साहित्य संमेलन | वाचनालय |
| कबड्डी स्पर्धा | ग्रंथालय |
| कामगार केसरी / कुमार केसरी कुस्ती स्पर्धा | अभ्यासिका |
| कामगार श्री - शरीर सौष्ठव स्पर्धा | व्यायामशाळा |
| कामगार नाट्यकर्मींचा सत्कार | योगावर्ग |
| कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या दाम्पत्यांचा सत्कार | धनुर्विद्या (आर्चरी) |
| शालांत परिक्षा मार्गदर्शन शिबिर / गाईडन्स | टेबल टेनिस कोर्ट |
| स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर | हस्तकला वर्ग |
| रोजगार मेळावा | फॅशन डिझायनिंग वर्ग |
| स्वयंरोजगार /उद्योग/ बचतगट प्रशि शिबिर | ग्रंथपालन प्रमाणपत्र शिक्षण वर्ग |
| क्रीडा प्रशिक्षण शिबिर | बॅडमिंटन कोर्ट |
| नाट्य प्रशिक्षण शिबिर | जलतरण तलाव |
| दूर पल्ल्याची सहल | कराटे प्रशिक्षण वर्ग |
| करीयर गाईडंन्स | ब्यटी पार्लर वर्ग |

| वैद्यकीय अर्थसहाय्य योजना | प्रत्यक्ष झालेला खर्च | मिळणारे अर्थसहाय्य |
|---|---|---|
| गंभीर आजार उपचार अर्थसहाय्य - कामगार /कामगार कुटुंबियांना कर्करोग, हृदयरोग, एडस, क्षयरोग आदी दुर्धर आजाराच्या औषधोपचारासाठी खालीलप्रमाणे अर्थसहाय्य दिले जाते. | रु. १०,०००/- ते रु. २५,०००/- | रु. ५,००/- |
| | रु. २५,००१/- ते रु. ५०,०००/- | रु. १०,०००/- |
| | रु. ५०,००१/- ते रु. ७५,०००/- | रु. १५,०००/- |
| | रु. ७५,००१/- ते रु. १ लाख | रु. २०, ०००/- |
| | रु. १ लाखापेक्षा अधिक | रु. २५,०००/- |